# " भारताचे G20 अध्यक्षपद आणि भारताची भूमिका "

**डॉ. अनिल रा. कडु** (राज्यशास्त्र विभाग) स्व. पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय
वरूड, जिल्हा - अमरावती 444 906

---

**गोषवारा :**

भारताच्या G20 अध्यक्षकाळाची संकल्पना " वसुधैव कुटुंबकम् " म्हणजे एक पृथ्वी कुटुंब ही संकल्पना, संस्कृत महाउपनिषदातून घेतली आहे. भारताचा G20 अध्यक्षीय कार्यकाळ अमृतकाळाच्या म्हणजे 25 वर्षाचा काळ जो 15 ऑगस्ट 2022 पासून म्हणजे भारताच्या स्वातंत्र्याच्या 75 वर्षापासून सुरू होऊन स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षापर्यंत चालणाऱ्या भविष्यवेधी, समृद्ध, समावेशक आणि विकसित समाजाच्या पूर्ततेच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या आणि मानव केंद्री दृष्टिकोन केंद्रस्थानी 25 वर्षाच्या कालखंडाच्या प्रारंभ सोबतच सुरू झाला असल्याने भारतासाठी हा काळ विशेष महत्त्वाचा आहे. भारत हा G20 चा 1999 पासून सदस्य आहे. रशिया - युक्रेन संघर्ष आणि जागतिक निर्बंधांमध्ये भारताला G20 चे अध्यक्षस्थान मिळाले होते. जागतिक विकासासाठी भारताचा दृष्टिकोन, हरित आणि डिजिटल चळवळ ' ग्लोबल कॉमन गुड ' वर नव्याने जोर देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भारताचे परराष्ट्र धोरण बदलले आहे. G20 च्या नेतृत्वाद्वारे भारत हवामान बदल, उदयोन्मुख तंत्रज्ञान, अन्न आणि ऊर्जा, सुरक्षा यासह जागतिक समस्यांसाठी दीर्घकालीन आणि योग्य दृष्टिकोन शोधण्याचा प्रयत्न करतो.

**प्रस्तावना :**

G20 हा जगातील सर्वात मोठया विकसित आणि विकसनशील अर्थव्यवस्थांचा एक समूह आहे जो आंतरराष्ट्रीय आर्थिक तसेच राजकीय सहकार्यासाठी एक मंच म्हणून कार्य करतो. अर्थमंत्री आणि सेंट्रल बँक गव्हर्नर यांच्यासाठी आंतरराष्ट्रीय आर्थिक आणि राजकीय विषयांवर चर्चा करण्यासाठी एक मंच म्हणून 1999 मध्ये आशियाई आर्थिक संकटाच्या वेळी त्याची स्थापना करण्यात आली. फायनान्स ट्रॅक आणि शेर्पा ट्रॅक हे दोन समवर्ती ट्रक आहेत जे G20 बनवतात. फायनान्स ट्रॅक वित्त आणि अर्थव्यवस्थेशी संबंधित समस्यांसाठी जबाबदार आहे. तर शेर्पा ट्रॅक राजकीय समस्यांसाठी जबाबदार आहेत. या व्यतिरिक्त त्यात असे गट आहेत जे त्यांना धोरण तसेच शिफारशी देतात, व्यवसाय कामगार, नागरी समाज, थिंग टॅंक, युवक आणि महिला यासारख्या विविध मुद्द्यांवर G20 नेते यांना त्या संस्था मदत करत असतात. G20 मध्ये 19 देश आणि युरोपियन युनियन (EU) यांचा समावेश आहे. अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, फ्रान्स, जर्मनी, भारत, इंडोनेशिया, इटली, मेक्सिको, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, दक्षिण कोरिया, तुर्की, युनायटेड किंगडम आणि अमेरिका हे सदस्य देश आहेत. हे जागतिक अर्थव्यवस्थेची संबंधित प्रमुख समस्यांचे निराकरण करण्यासाठी मार्ग कार्य करते, जसे की आंतरराष्ट्रीय आर्थिक स्थिरता, हवामान बदल आणि शाश्वत विकास. G20 सदस्य देशांची जागतिक जीडीपीच्या 80 टक्के पेक्षा जास्त, वाणिज्य 75% आणि जगाच्या लोकसंख्येच्या 60% लोकसंख्या या देशात वास्तव्यास आहे. भारत 1 डिसेंबर ते 30 नोव्हेंबर 2023 पर्यंत G20 चे अध्यक्ष स्थान भूषवले.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये :**

G20 शिखर परिषदेत भारताच्या संदर्भात देशाची ताकद, कमकुवतपणा, संधी आणि आव्हाने यांचे विश्लेषण करणे हे या लेखाचे उद्दिष्ट्य आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत अध्ययनासाठी तथ्य संकलन करताना द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. अध्ययन विषयाशी संबंधित दुय्यम तथ्य संकलित करण्यासाठी प्रकाशित, अप्रकाशित

असलेले शोध अध्ययन, संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, संशोधन पत्रिका इत्यादी दुय्यम श्रोतांच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

**आशय विश्लेषण :**

1 डिसेंबर 2022 हा भारतासाठी एक संस्मरणीय दिवस ठरला. याच दिवशी भारताने इंडोनेशियाकडून G20 चे अध्यक्षपद स्वीकारले आणि 2023 मध्ये भारत पहिल्यांदाच G20 सदस्य देशांच्या नेत्यांची बैठक भारतात आयोजित केली गेली. भारतासारख्या लोकशाही आणि बहुराष्ट्रीयत्वाच्या तत्वासाठी पूर्णपणे कटिबद्ध असलेल्या भारताला हे G20 चे अध्यक्षपद मिळाले होते. ही आपल्या देशासाठी एक ऐतिहासिक घटना असून, सर्वांच्या कल्याणासाठी, जागतिक समस्यांवर काही व्यवहारिक तोडगे शोधण्याच्या दृष्टीने भारताची ही अध्यक्षपदाची भूमिका महत्त्वाची ठरली. 'वसुधैव कुटुंबकम' किंवा 'जग हे एक कुटुंब' या तत्त्वाचे पूर्ण दर्शन या परिषदेमध्ये घडले. संयुक्त राष्ट्राच्या जस न्यूयॉर्कमध्ये एक कार्यालय आहे, तस G20 देशाचं कायमस्वरूपी कार्यालय किंवा सचिवालय नाही. अजेंडा आणि समन्वय साधण्याचं काम G20 प्रतिनिधी करतात ज्यांना शेरपा म्हणून ओळखल जात. दरवर्षी एका देशाकडे G20 चं अध्यक्षपद येत. यालाच G20 प्रेसिडेन्सी म्हणतात. प्रत्येक प्रेसिडेन्सीच्या शेवटी G20 राष्ट्रगटाची बैठक होते आणि कारभार पुढच्या अध्यक्षांकडे सोपवला जातो. G20 चे विद्यमान अध्यक्ष आधीचे आणि पुढचे अध्यक्ष राष्ट्र यांच्या मदतीनं कारभार चालवतात. भारत इंडोनेशिया आणि ब्राझीलच्या मदतीनं G20 चा कारभार पाहत आहे.

**1. भारत जगाच्या केंद्रस्थानी :**

भारताकडे G20 च्या अध्यक्षपदाची जबाबदारी आली तो काळ आपण लक्षात घेतला पाहिजे. कोविड - 19 महासाथीनंतरच्या या काळात भारताने ज्या पद्धतीने पुनर्बांधणी केली त्याचेही कौतुक होते. भारताने लसनिर्मितीमध्ये चमत्कार घडवून आणला. एवढेच नव्हे तर 100 पेक्षा जास्त देशांना 30 कोटींपेक्षा जास्त लसी पुरवल्या. यातले बरेच देश हे ग्लोबल साउथमध्ये होते. या ' लस मैत्री ' ने प्रचंड सद्भावना निर्माण केली. काही परदेशी नेत्यांनी भारतीय लसींचा विशेष उल्लेख केला. भारताने आमच्या देशातील नागरिकांचे प्राण वाचवले आणि या लसी अजूनही आमच्या नागरिकांच्या रक्तवाहिन्यांमध्ये जात आहेत, अशा शब्दांत त्यांनी भारताचे आभार मानले.

भारताचे G20 अध्यक्षपद हा भारतीयत्वाचा उत्सव होता. यामुळे भारताचा सांस्कृतिक, बौध्दीक आणि अध्यात्मिकतेचा वारसा जगासमोर आला. विविधता आणि भव्यता या प्रणालीने भारताचा 5 हजार वर्षांचा सांस्कृतिक वारसा सर्वांसमोर आला. ओडिशा मधील कोणार्क मंदिर असो की नालंदा विद्यापीठाची पार्श्वभूमी असो किंवा भारत मंडपम मधली उत्तुंग नटराज असो. 18 हजार कलाकारांच्या सहभागाने नटलेले 300 सांस्कृतिक कार्यक्रम, शास्त्रीय नृत्य आणि लोकनृत्य, प्राचीन रुद्र विना संगीत, संवादात्मक कला प्रदर्शन, पाककृतींचे प्रदर्शन अशा सर्व कार्यक्रमांमधून भारताच्या समृद्ध परंपरेचे दर्शन अखिल जगाला घडले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा करिष्मा आणि वैयक्तिक संबंधांच्या पलीकडे जाऊन बहुक्षेत्रीय आणि अर्थपूर्ण परिणाम घडवून आणण्यासाठी आता भारत शक्तीचा युक्तिवाद वापरू शकतो. भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी, पाचव्या क्रमांकाची आणि लवकरच तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनणार आहे. 'सर्व काही शक्य आहे' हा नव्या भारताचा आत्मविश्वास आणि वाढते भू-राजकीय महत्त्व पाहता हे भारताचे दशक आहे असे सकारात्मक चित्र निर्माण होते. हे शिखर परिषदेच्या पूर्व उपस्थितीत देखील दिसून आले. या शिखर परिषदेत 43 देशांचे प्रमुख आणि आंतरराष्ट्रीय संस्था उपस्थित होत्या रशियाचे अध्यक्ष पुतीन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग वगळता सर्व G20 नेते परिषदेला उपस्थित

होते. पुतीन आणि जिनपिंग यांच्या अनुपस्थितीची काही वैयक्तिक कारणे असली तरी रशियाचे परराष्ट्रमंत्री लेव्हरोव्ह आणि चीनचे पंतप्रधान लि कियांग परिषदेला उपस्थित राहिले.

**2. लोकांची G20 परिषद - न्याय आणि एकता :**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वचन दिल्याप्रमाणे ही परिषद उच्चभ्रूपुरतीच मर्यादित न राहता सर्व लोकांपर्यंत पोहोचले. संयुक्त राष्ट्राच्या जन भागीदारीच्या सनदेप्रमाणे यात सर्व लोकांचा आवाज उमटला. अधिकारी, कार्पोरेट्स, नागरी समाज, तळागाळातील समाजातील नेते, महिला, तरुण आणि अगदी शाळकरी मुले अशा एकूण 67 दशलक्ष लोकांचा यात सहभाग होता.

दहशतवादाचा मुकाबला, शाश्वत विकास, हवामान बदल रोखणे लोकशाही आणि मानवाधिकार यांचे समर्थन, संकटाला मानवतावादी प्रतिसाद, सर्व देशांतर्गत आणि लोकांपर्यंत तंत्रज्ञानाचे लाभ पोहोचवणे तसेच शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करणे यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. पंतप्रधान मोदींनी मानवकेंद्रीत विकासावर लक्ष दिले आहे. तसेच आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय सुव्यवस्था निश्चित करण्यासाठी जागतिक ऐक्याच्या तत्त्वांच्या आधारे लोकांच्या सक्षमीकरणाला बळकटी दिली आहे.

**3. लोकशाहीकरण आणि सर्वसमावेशकता :**

भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा आणि तरुणांचा देश आहे. त्यामुळेच लोकसंख्याशास्त्रीय लाभांश घेण्यास भारताला तयार करणे हे महत्त्वाचे काम आहे. भारतातील आणि प्रदेशातील दुष्ट हेतूने प्रेरित असलेल्या टीकाकारांना जोरदार प्रत्युत्तर म्हणून भारताने भरभराटीची, सर्वात मोठी, सर्वात जुनी, सर्वात विविधरंगी आणि सर्वात समृद्ध लोकशाही म्हणून आपली ओळख जगासमोर निर्माण केली आहे. ही लोकशाही भावना भारताच्या G20 मध्ये प्रतिबिंबित झाली. सर्वात मोठा आणि सर्वसमावेशक लोकशाही असलेला भारत देश आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या ग्लोबल साउथ चे नेतृत्व करू शकतो ही बाब या परिषदेच्या निमित्ताने अधोरेखित झाली.

दिल्ली शिखर परिषदेपूर्वी आणि अध्यक्षपदाच्या सुरुवातीलाच भारताने 125 देशांचा सहभाग असलेली 'व्हाईस ऑफ द ग्लोबल साउथ' परिषद आयोजित केली होती. यासाठी ग्लोबल साउथमधून सर्वाधिक संख्येने अतिथी देशांना आमंत्रित करून भारताने दिल्ली शिखर परिषदेला सर्वसमावेशक बनवले. 31 देशांचे नेते आणि 11 आंतरराष्ट्रीय संस्थांच्या प्रमुखांनी G20 शिखर परिषदेला हजेरी लावली. यात 125 देशांचे प्रतिनिधि होते. ही संख्या आतापर्यंतची सर्वाधिक संख्या होती. यात आफ्रिकेचा सर्वात मोठा सहभाग होता. दक्षिण आफ्रिका, नायजेरिया, मॉरिशस इजिप्त आणि आफ्रिकन युनियनचे प्रतिनिधी ही परिषदेला उपस्थित होते.

**4. G20 परिषद आणि आर्थिक सुरक्षा :**

वाढत्या अन्नसंकटातून देण्यासाठी आणि युद्धाचे नकारात्मक परिणाम संबोधित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या मध्यस्थीने 'ब्लॅक सी ग्रेन डील' म्हणजे काळा समुद्रातून धान्य वाहतुकीचा करार करण्यात आला. रशिया, युक्रेन आणि तुर्की यांच्यातील कराराचे पुनर्जीवन करण्यासाठी भारताने G20 ला आर्थिक सुरक्षा परिषदेचे स्वरूप दिले. कोविड नंतरची सामाजिक- आर्थिक मंदी, अन्न टंचाई, इंधन टंचाई, कर्ज, हवामान संकट आणि शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यातील आव्हाने असे ग्लोबल साउथ वर परिणाम करणारे मुद्देही या परिषदेत चर्चेला आले.

दहशतवादाला मिळणारा निधी, पैशांची अफरातफर, क्रिप्टो, मालमत्तेचे नियम, भ्रष्टाचाराशी लढा, एक आरोग्य, साथीच्या रोगाची तयारी आणि प्रतिसाद यासह जागतिक आर्थिक व्यवस्थापन आणि प्रशासनाच्या व्यापक समस्यांशी सामना करण्यासाठीचे उपाय यावरही परिषदेत चर्चा झाली.

**5. जागतिक प्रणालीला आकार देणारा भारत :**

G20 शिखर परिषदेमुळे एक प्रामाणिक देश किंवा जागतिक प्रणालीला आकार देणारा देश म्हणून भारताचा जागतिक परिघावर उद्या झाला. भारत आर्थिक आणि शाश्वत विकास निर्णय घेण्याच्या केंद्रस्थानी आला. या परिषदेच्या निमित्ताने भारताने अनेक जबाबदाऱ्या स्वीकारल्या आणि आपले योगदान ही दिले. हवामान बदल आणि पर्यावरण, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, आणि आपत्ती जोखीम कमी करणे अशा उपक्रमांसाठी एक कार्य गटाची स्थापना झाली. ही बाब ऐतिहासिकच आहे.

भारताचा आवाज आणि प्राधान्यक्रम हा ग्लोबल साउथचा आवाज असेल, असे वचन पंतप्रधान मोदींनी दिले होते. G20 शिखर परिषदेने या उद्दिष्टला दिशा मिळाली. त्यासाठी मार्गदर्शक तत्वे आणि मानके तयार झाली. या परिषदेमुळे सरकारने आणि जागतिक संस्थांना सर्वसमावेशक, निर्णायक, कृती - केंद्रित आणि महत्त्वकांक्षी परिणाम साधण्यासाठी कार्यक्रम मिळाले.

**6. शाश्वत विकास उद्दिष्टांना गती देणे :**

शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये संथ प्रगती होत आहे. यातली 88% उद्दिष्टे पूर्ण झाली नाहीत. हे ओळखून या परिषदेने महत्त्वाचे उद्दिष्टांसाठी कृतीकार्यक्रम ठरवले. यामध्ये पुढील सात वर्षांच्या कृतींचे मार्गदर्शन करण्यासाठी शाश्वत विकास उद्दिष्टांची प्रगती साधण्याच्या दृष्टीने G20 उच्चस्तरीय तत्वे स्वीकारण्याचा समावेश आहे. महत्त्वाच्या माहितीचे संकलन, वित्त पुरवठ्यासाठी संरचना, प्रतिवर्ष 500 अब्ज अमेरिकी डॉलरच्या SDG प्रोत्साहनावर UNSG प्रस्ताव आणि 2030 पर्यंत 1.2 ट्रिलियन अमेरिकी डॉलर्सच्या निधीसाठी बहुपक्षीय वित्तीय संस्थांसोबत वर्षभरात 260 अब्ज अमेरिकी डॉलर्स प्रधान करण्याची गरज या सर्व बाबी या परिषदेत अधोरेखित झाल्या.

G20 रोडमॅप च्या अनुषंगाने वित्तपुरवठ्याची तूट कमी -कमी करण्यासाठी आणि शाश्वत वित्त वाढवण्यासाठी सर्व स्त्रोतांकडून पुरेसा आणि सुलभ वित्त पुरवठा एकत्रित करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे हवामान वित्त हे शाश्वत उद्दिष्टांना पूरक ठरेल, असे स्पष्ट करण्यात आले शून्य उपासमारीच्या उद्दिष्टांतर्गत अन्नसुरक्षा आणि पोषणाची उच्चस्तरीय तत्वे स्वीकारण्यात आली. हवामान पूरक लवचिक आणि शाश्वत शेती पुढे नेण्याचे काम हाती घेण्यात आले. अन्न आणि ऊर्जेच्या किमतीतील अस्थिरतेचे परिणाम लक्षात घेता कृषी विकास संसाधनासाठी आंतरराष्ट्रीय निधीत वाढ करण्यात आली.

**7. हरित विकास करार :**

शाश्वत भविष्यासाठी मजबूत हरित विकास करार हा या परिषदेचा एक मोठा विजय होता. पंतप्रधान मोदींनी जाहीर केलेल्या लाइफ मिशनचे G20 उच्चस्तरीयतत्त्वांमध्ये रूपांतर करण्यात आले. यामध्ये शाश्वत विकासासाठी जीवनशैलीची तत्वे सांगितली आहेत. ग्रीन क्लायमेट फंडाची महत्त्वकांक्षी दुसरी भरपाई, खाजगी वित्त आणि विकसित देशांच्या हवामान - अनुकूल तंत्रज्ञानाची वाटणी, उपयोजना आणि वित्तपुरवठा तसेच बहुवर्षीय तांत्रिक साह्य योजना लागू करण्यासाठी वचनबद्धता ठरवण्यात आली.

G20 शिखर परिषदेत 100 अब्ज अमेरिकी डॉलर्सच्या पॅरिस वचन पद्धतीची अंमलबजावणी करण्याची आवाहन करण्यात आले. तसेच एक महत्त्वकांक्षी पारदर्शक असे सामूहिक धोरण ठरवण्यात आले. विकसित देश आणि बहुपक्षीय विकास बँकांची मदत घेऊन हा निधी वाढवण्याचा निर्णय झाला. विकसनशील देशांसाठी 2025 पर्यंत उत्सर्जन रोखण्याच्या उद्दिष्टांवर सहमती, हवामानामुळे उद्भवणाऱ्या आपत्तींचा इशारा देणाऱ्या प्रणालींचा वेग वाढवणे, 2050 पर्यंत जागतिक निवळ शून्य लक्ष गाठण्यासाठी सामाईक परंतु भिन्न जबाबदारी आणि राष्ट्रीय क्षमता निर्धारित धोरण असे निर्णय यात झाले.

**8. बहुपक्षीय संस्थांमध्ये सुधारणा :**

बहुपक्षीय संस्थांच्या सुधारणांबाबत भारत आणि ग्लोबल साऊथ ची अनेक उद्दिष्टे साध्य होणार आहेत. याआधी ती अकार्यक्षमतेमुळे अडकली होती. हे संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अंटोनिओ गुटेरेस यांनी मान्य केले. G20 ने प्रथम संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या ठरावाने बहुपक्षीय आणि सुधारणांसाठी एकत्रितपणे स्मरण केले. अशाप्रकारे संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत भारत आणि ग्लोबल साऊथ ची बाजू मजबूत केली. या सुधारणांमुळे विकसनशील देशांना आर्थिक मदत होण्यास हातभार लागला आहे. केवळ लाभार्थी म्हणून नव्हे तर निर्णय घेणारे म्हणून आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्थांमध्ये विकसनशील देशांचे प्रतिनिधित्व आणि आवाज वाढवण्याचे आग्रही आवाहन या परिषदेत करण्यात आले. तसेच आंतरराष्ट्रीय नाणेनिधी कोठा सुधारणा डिसेंबर 2023 पर्यंत पूर्ण करण्याचे आवाहनही करण्यात आले.

**9. महिलांच्या नेतृत्वाखालील विकास :**

महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाच्या संकल्पनेबद्दल G20 मध्ये प्रथमच पंतप्रधान मोदींनी पुढाकार घेतला. नवी दिल्लीमध्ये नेत्यांच्या जाहीरनाम्यात महिलांच्या सामाजिक- आर्थिक सक्षमीकरणासाठी सर्वात व्यापक आणि विस्तृत वचनबद्धता ठरवण्यात आली. यामध्ये हवामान बदल अन्नसुरक्षा पोषण आणि कल्याण या बाबींचा विचार करण्यात आला आहे. तसेच हिंसा आणि पूर्वग्रह संपुष्टात आणण्याचाही निर्धार आहे. 2030 पर्यंत लैंगिक डिजिटल अंतर निम्म्याने कमी करण्याचे आणि 2025 पर्यंत कामगार शक्तीतील सहभागातील अंतर 25 टक्क्यांनी कमी करण्याचे लक्ष गाठण्याचा निर्धार करण्यात आला आहे. महिला सक्षमीकरणावर स्वतंत्र कार्य गटाची निर्मिती हा एक चिरस्थाई वारसा आहे. यामुळे महिलांना मुख्य प्रवाहात येण्यास मदत होईल.

**10. चीनच्या आव्हानाचा सामना :**

भारताचे G20 अध्यक्षपद आणि SCO अध्यक्षपद चीनच्या धोरणात्मक वर्तुळात जोरदार चर्चा करत आहे. कोणता देश, भारत किंवा चीन, आपल्या फायद्यासाठी या प्रसंगाचा अधिक चांगला उपयोग करू शकतो. आणि वाढत्या गुंतागुंतीच्या द्विपक्षीय समीकरणांमध्ये वरचढ ठरू शकतो हे पाहणे बाकी आहे. एकीकडे, चीन बद्दलची आपली भूमिका मवाळ करण्यासाठी भारतावर दबाव आणण्याची संधी चीन घेऊ शकेल आणि तो वापरावा अशी आशा आहे. चिनी विद्वान समुदायाचा असा युक्तिवाद आहे की भारत यावर्षी आंतरराष्ट्रीय कार्यक्रमाच्या मालिकेचे आयोजन करणार आहे ज्यामध्ये चीनचा सहभाग गंभीर आहे, त्यामुळे भारताकडे चीनशी संबंध सुधारणे, सीमा विवाद कमीत कमी अल्पावधीत सोडविण्याशिवाय पर्याय नाही.

**11. यशाची गुरुकिल्ली :**

नवी दिल्ली घोषणाचा शेवटचा परिच्छेद पाहिला तर लक्षात येते की G20 परिषद जागतिक आर्थिक सहकार्याचा प्रमुख मंच राहील आणि जगाला सध्याच्या आव्हानांमधून बाहेर काढण्यासाठी एक सुरक्षित, मजबूत, अधिक लवचिक, सर्वसमावेशक आणि आरोग्यदायी संरचना निर्माण करेल. अखिल जगाच्या कल्याणासाठी ही संरचना प्रेरक ठरेल. G20 मध्ये ग्लोबल साउथ च्या जागतिक नेत्यांनी सहभाग घेऊन भारताच्या कारभाराचे कौतुक केले हेही तितकेच महत्त्वाचे आहे. इंडोनेशिया, भारत, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका या ग्लोबल साउथ च्या चार प्रमुख अर्थव्यवस्थांनी G20 च्या संयोजनाद्वारे परिवर्तन घडवून आणण्याचा निर्धार केला आहे. G20 परिषद विकसनशील देशांमधील शक्ती संतुलन साधून जागतिक शासन प्रणालींना आकार देण्याचे कार्य बजावू शकते. ब्राझील आणि दक्षिण आफ्रिकेने यासाठी कठोरपणे पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

अमेरिका आणि इतर G7 देशांनी देखील भारतासोबतच्या धोरणात्मक भागीदारी बद्दलची त्यांची वचनबद्धता मान्य केली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील G20 परिषदेची प्रशंसा केली. आपल्या सर्वात महत्त्वाचा समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता या परिषदेत आहे असे बायडन म्हणाले. तसेच संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेतही बायडन यांनी जी ट्वेंटी परिषदेच्या यशाचा उच्चार केला. चीननेही या परिषदेच्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले. G20 परिषदेचे यश हे भारताच्या परराष्ट्र धोरणासाठी आणि राष्ट्रीय एकत्रीकरणासाठी महत्त्वाचे आहे. ही परिषद म्हणजे उदयोन्मुख जागतिक व्यवस्थेमध्ये भारत केंद्रस्थानी असल्याचा अभिमानास्पद दाखलाच आहे.

**निष्कर्ष :**

आपल्या अध्यक्षपदाच्या काळात, भारताला प्रमुख मुद्द्यांवर आणि सुधारणांच्या अंमलबजावणीवर अर्थपूर्ण परिणाम मिळवण्यासाठी सदस्यांमधील सहकार्य सुनिश्चित करण्यासाठी तीव्रतेने नेव्हीगेट आणि वाटाघाटी कराव्या लागतील. रशिया -युक्रेन संकटाच्या वेळी स्वतःच्या बहुसंतेखित दृष्टिकोनातून बाहेर पडणे नवी दिल्लीला चांगले होईल, सर्व बाजूंशी कनिष्ठ भागीदारी असलेल्या काही जागतिक राष्ट्रांमध्ये, तसेच covid-19 महामारीच्या शिखरावर लस आणि औषध कूटनीती यांसारख्या जागतिक समस्यांसाठी अलीकडील इतर सहयोगी दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. सर्व राष्ट्रीय बोर्डात राहतील याची खात्री करून एक मत निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून एक तर निर्माण केल्याने भारताला त्याच्या अध्यक्षपदाच्या "एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य" या सर्वसमावेशक थीमवर खरे राहत आहे.

**सदर्भ :**

1. Mahida Rinkesh, Chauhan Sani, - 'A study of presidency of the G20 in India SWOC analysis' - Vidya- A journal of Gujrat University. - August 2023.

2. ' G20 म्हणजे काय ' - bbc.com - 11 नोव्हेंबर 2022.

3. चितळे एन. - ' G20 आणि भारताचे अध्यक्षपद - परराष्ट्र व्यवहार मंत्रालय ' - pib.gov.in - 10 डिसेंबर 2022.

4. गायकवाड पल्लवी, - ' G20 History: G20 परिषद कधीपासून आणि कोणत्या उद्देशाने सुरू झाली? ' - marathi.abplive.com- 9 सप्टेंबर 2023.

5. ' भारताचे G20 अध्यक्षपद : उत्तर - दक्षिण फूट दूर करणे ' - orfonline.org - 13 सप्टेंबर 2023.

6. Ghoshal singh Antara - ' भारताचे G20 अध्यक्षपद : चीनच्या आव्हानाचा सामना ' - orgonline.org - 6 सप्टेंबर 2023.

7. ' भारताचे G20 अध्यक्षपद यशस्वी का झाले? नेत्यांच्या नवी दिल्लीतील घोषणेचे सखोल विश्लेषण ' - orfonline.org - 15 डिसेंबर 2023.